# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.04.2025** **वार-मंगळवार**

---

**लष्कर**

पुण्यातील लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचा 131 वा स्थापना दिवस आज साजरा करण्यात आला. दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल एस. पी. सिंग यानी यावेळी इथल्या युद्ध स्मारकावर पुष्पहार अर्पण करून हुतात्म्यांना अभिवादन केले. या स्थापना दिनानिमित्त दक्षिण कमांडकडून 'शौर्याचे प्रतिध्वनी' हा विशेष कार्यक्रम सुरू केला आहे.

**पशुगणना**

पुणे तसेच राज्यात यंदा प्रथमच ऑनलाइन पशुगणना होत आहे. यामध्ये 16 प्रजातींची नोंद करण्यात येत आहे. गाय, बैल, म्हैस, रेडे, शेळी, मेंढी, घोडा, गाढव, कुत्रा, मांजर, डुक्कर आदी पशुधन तसेच कोंबड्यांचीही गणना केली जात आहे. यातील काही पशूंची मात्र, प्रथमच गणना होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेनंतर पशुगणनेला सुरुवात झाली. 31 मार्चअखेर ही मुदत होती. पण, राज्यात पशुगणना धीम्या गतीने असल्याने पुन्हा मुदत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे आता 15 एप्रिलपर्यंत पशुगणना पूर्ण करावी लागणार आहे.

**कोथरूड**

कोथरूड मधील रस्ते, पाणी प्रश्नी वस्तुस्थिती आणि आदर्श स्थितीवर आधारित अहवाल सादर करण्याचे निर्देश कोथरूचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी  बैठकीत दिले आहेत. कोथरुड मधील रस्ते, पाणी, वाहतूक कोंडी आदी प्रमुख विषयासंदर्भात पाटील यांच्या निवासस्थानी बैठक झाली. उन्हाळ्याच्या समान पाणीपुखठा व्हावा यासाठी उपाययोजनांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला.

**मेट्रो**

महामेट्रोकडून वनाज ते चांदणी चौक या विस्तारीत मेट्रो मार्गाचे काम लवकरच सुरू केले जाणार आहे. या मेट्रो मार्गासोबतच पौड रस्त्यावर कचरा डेपोपासून लोहिया आयटी पार्कपर्यंत दुमजली उड्डाणपूल उभारला जाणार आहे. याचा आराखडा महामेट्रोने महापालिकेस सादर केला आहे. या पुलासाठी महामेट्रोकडून 85 कोटींचा खर्च अपेक्षीत धरण्यात आला आहे. त्यामुळे, पौड रस्त्यावर कोथरूड डेपो परिसरात होणारी वाहतूक कोंडी फुटण्यास मदत होणार आहे.

**क्षयरोग**

क्षयरोगाचे निदान झालेल्या रुग्णांना चांगला आहार मिळावा, त्यांची प्रतिकारशक्ती वाढावी म्हणून राज्य शासनाकडून दोन टप्प्यांत सहा हजार रुपये दिले जातात. पुणे शहरात वर्षभरात 5 हजार 214 रुग्णांना या योजनेचा लाभ मिळाला. निक्षय मित्र योजनेच्या माध्यमातून उद्योजक, खासगी व्यावसायिक, स्वयंसेवी संस्था, यांचा सहभागाने क्षयरुग्णांसाठी मदत करण्यात येते. पुणे महापालिकेच्या अंतर्गत 66 जणांनी निक्षय मित्र म्हणून सहभाग नोंदवला आहे. त्यांनी तीन हजार 32 रुग्णांना 7 हजार 750 पोषण आहार संचाचे वाटप केले असल्याची माहिती शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रशांत बोथे यांनी दिली आहे.

**बांधकाम**

पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाला 2024-25 या आथिक वर्षात बांधकाम परवानगीतून 2 हजार 601 कोटींचे विक्रमी उत्पन्न मिळाले आहे. मिळकत कर विभागाला सुमारे 2 हजार 355 कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. वर्षातील सर्वाधिक उत्पन्न मिळविण्यात महापालिकेचा बांधकाम विभाग सलग दुसऱ्या वर्षी सरस ठरला आहे. बांधकाम विभागाला गतवर्षीपेक्षा 109 कोटी रुपये जास्त तर मिळकतकर विभागाला गतवर्षीपेक्षा 86 कोटी रुपये जास्त उत्पन्न मिळाले होते.

**महिला सन्मान**

घर आणि उद्योग सांभाळताना येणाऱ्या अडचणींनी खचून न जाता महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये उद्योगांसाठी पुढे आले पाहिजे असं प्रतिपादन यशस्वी संस्थेच्या संचालिका स्मिता धुमाळ यांनी केलं आहे. शिवउद्योग प्रबोधिनीमार्फत आज पुण्यात महिला उद्योजिका सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या.

**प्रकाशक**

विदिशा विचार मंच आणि कोहिनूर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमानं येत्या 5 एप्रिल रोजी पुण्यातील सहा प्रकाशन संस्थांचा प्रातिनिधीक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी यांनी दिली आहे. नवी पेठेतील पत्रकार भवन इथं हा कार्यक्रम होणार आहे.

**एसएम जोशी**

पुण्यातील बाजीराव पथावरील एस एम जोशी यांच्या पुतळ्याला स्मृतीदिनानिमित्त पुष्पहार अर्पण करून आज अभिवादन करण्यात आले.

**डिजिटल अरेस्ट**

डिजिटल अरेस्टची भीती दाखवून पुण्यातील ज्येष्ठ महिलेकडून सायबर चोरट्यांनी सुमारे अडीच कोटी रुपये उकळले आहेत. पुण्यातील डेक्कन जिमखाना परिसरातील ही घटना आहे. सायबर चोरट्यांनी महिलेला व्हॉट्सॲप संदेश तसच व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून डिजिटल अरेस्ट केल्याचं भासवले आणि पैशाची मागणी केली. सायबर शाखा या प्रकरणात अधिक तपास करत आहे.

**टेनिस**

पुण्यात जिल्हास्तरीय टेनिस स्पर्धेत आठ वर्षाखालील गटात आर्या कसबे आणि रेयांश हुंदलानी तर दहा वर्षाखालील गटात रीतिषा नेहे आणि राजस आंबेकर यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजेतेपद मिळवले.

**फुटबॉल**

पीडीएफए फुटबॉल लीग 2025 स्पर्धेत सांगवी एफसी, असोसिएशन पुना सोशल, टायगर्स कम्बाईन, बोपोडी एफसी, एफसी शिवनेरी, डायनामाईट्स एससी आणि साई फुटबॉल ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सुरुवात केली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं तर कमाल तापमान 35 दशांश अंश तर किमान तापमान 22 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.उद्या आकाश ढगाळ तसेच हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतामध्ये, नमस्कार.**